CAS 01 05 2025 circular 2025

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**परिपत्रक क्र. आस्था / विभाग/ 20 /२०२५**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील शासनमान्य पदावर कार्यरत सर्व शिक्षकांना कळविण्यात येते की, करिअर ॲडव्हान्समेंट योजने अंतर्गत शिक्षकांना द्यावयाच्या पदोन्नतीसाठी विद्यापीठाने नियमावली - १८९४ प्रसिध्द केली आहे. तसेच आयोगाने वेळोवेळी सदरील अधिसुचनेत सुचविलेल्या दुरुस्त्या व शासनाने त्यानुसार निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार विद्यापीठातील करिअर ॲडव्हान्समेंट योजनेअंतर्गत (कॅस) पदोन्नती/स्थाननिश्चितीसाठी पात्र झालेल्या तसेच पुढील तीन महिन्यात पात्र होणाऱ्या शिक्षकांकडून परिपत्रक क्र. आस्था/विभाग/०९/२०२५ दि. १६.०६.२०२५ अन्वये प्रस्ताव मागविण्यात आले होते, सदरील परिपत्रकाच्या अनुषंगाने कॅसचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

तद्नंतर, पूढील कॅस पदोन्नतीसाठीची बैठक माहे सप्टेंबर, २०२५ किंवा तद्नंतर होणार आहे करिता पदोन्नतीसाठी पात्र शिक्षकांनी कॅस पदोन्नतीसाठी लागणाऱ्या आवश्यक त्या सर्व बाबींची पडताळणी करुन तसेच खाली नमूद केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय व सुधारित शासन निर्णयाच्या अधीन राहून कॅस पदोन्नती/स्थाननिश्चितीचे प्रस्ताव (०५ प्रतीत) दि. ३० ऑगस्ट २०२५ पुर्वी कार्यालयीन वेळेत आस्थापना विभागात सादर करावेत.

(१) दि. १८-०७-२०१८ रोजीची विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसुचना.

(२) दि. ०८-०३-२०१९ रोजीचा शासन निर्णय.

(३) दि. ०८-०३-२०१९ रोजीच्या शासन निर्णयातील दि. १०.०५.२०१९ रोजी सुधारणा केलेला शासन निर्णय.

(४) दि. २४-०६-२०२४ रोजीचे शासन निर्णय.

आपला कॅस पदोन्नतीचा प्रस्ताव सादर करतांना सोबत जोडलेल्या कॅस पदोन्नतीचा प्रस्ताव/अर्जाच्या नमून्यामध्येच भरुन परिपत्रकासोबत जोडलेल्या विद्याशाखानिहाय गठित केलेल्या छाननी समितीमार्फत सुधारित API Performa नुसार API काढून गुणांकाच्या पुष्ट्यर्थसह योग्य ते पुरावे, अनुक्रमांक व पृष्ठक्रमांकासह छाननी केलेला प्रस्ताव उपरोक्त दिनांकापूर्वी सादर करावे.

सोबत:- १. कॅस पदोन्नतीसाठी सादर करावयाचा प्रस्ताव/अर्जाचा नमुना.
२. API Performa.
३. विद्याशाखानिहाय छाननी समिती.
४. दि. १८.०७.२०१८ रोजीची अधिसुचना, दिनांक ०९.०३.२०१९ व दि. १०.०५.२०१९ रोजीचा शासन निर्णय.

सदरील परिपत्रक व सोबत जोडलेले कॅस पदोन्नतीसाठीचा प्रस्ताव/अर्जाचा नमुना, API Performa, अधिसुचना व शासन निर्णय हे विद्यापीठाच्या संकेतस्थळवार उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

विद्यापीठ प्रांगण, छत्रपती संभाजीनगर )(
संदर्भ :- आस्था/विभाग/२०२५/20 )(
दिनांक :- ०४-०८-२०२५ )(
06

कुलसचिव

******

या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-

१) सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

२) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.

३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक व सोबत जोडलेले कॅस पदोन्नतीसाठीचा प्रस्ताव/अर्जचा नमुना, API Proforma, अधिसुचना व शासन निर्णय हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.